निवेदन

आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे.
करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!
संपर्क : ७२७६८७१००८

साप्ताहिक

संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaaawaz.in

■ वर्ष : १४ वे ■ अंक : १४ वा ■ सोमवार दि.२६ ऑक्टोंबर ते ०१ नोव्हेंबर २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने – ०४

तीचा गणपती झाला, ती दुर्गा... पान २ वर | सम्राट अशोक विजयादशमी... पान ३ वर | मुख्यमंत्री आरोग्य संवाद... पान ४ वर

जनतेच्या पैशातून जनतेची फसवणूक होत असेल, तर गप्प बसणे हाच भ्रष्ट व्यवस्थेला दिलेला पाठिंबा आहे; म्हणून आता नागरिकांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावलेच पाहिजे

ठेकेदाराच्या माध्यमातून प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी स्वहित साधत आहे का?

पुणे : पुणे शहर हे महाराष्ट्राची सांस्कृतिक आणि शैक्षणिक राजधानी म्हणून ओळखले जाते. पुणे शहराच्या विकासासाठी नागरिक कर भरतात. त्या करातून रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, उद्याने, आरोग्य, शैक्षणिक सुविधा आणि इतर सार्वजनिक सुविधा निर्माण केल्या जातात.

परंतु चांगल्या दर्जाचे काम पाडून पुन्हा नवीन काम केले जात असेल, तर त्यामागील कारणे जनतेसमोर आली पाहिजेत. निविदा प्रक्रियेत काही गैरप्रकार झाला असेल, तर त्याची चौकशी झाली पाहिजे. ठेकेदार आणि अधिकारी यांच्या संगनमतामुळे सार्वजनिक निधीचे नुकसान झाल्याचे सिद्ध झाले, तर जबाबदार व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे.

लोकप्रतिनिधी निवडून देण्याचा अर्थ त्यांना पाच वर्षे मनमानी करण्याचा परवाना देणे नव्हे. अधिकारी नेमण्याचा अर्थ त्यांना जनतेच्या पैशाचा हिशेब न देण्याची मुभा देणे नव्हे. लोकशाहीमध्ये सत्ता जनतेची आहे, पैसा जनतेचा आहे आणि उत्तरदायित्वही जनतेप्रतीच असले पाहिजे!



दि.३१/१२/२०२१ रोजीच्या वर्कऑर्डर नुसार काम चालू असलेबाबतचे छायाचित्र



भवन विभागाकडून सध्या चालु भिंतीच्या कामाच्या संदर्भात बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयामार्फत किंवा अन्य कोणत्या विभागामार्फत काम सुरू आहे. याची चौकशी चालू आहे.





कमला नेहरू हॉस्पिटलमधील सुस्थितीत असलेल्या स्टाईल्स/फरश्या फोडण्यात आल्या





कमला नेहरू हॉस्पिटलमधील फोडण्यात आलेल्या फरश्याच्या ठिकाणी वृत्तपत्राने झाकण्यात आले

जनतेची आहे, पैसा जनतेचा आहे आणि उत्तरदायित्वही जनतेप्रतीच असले पाहिजे!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला लोकशाही व्यवस्थेत अधिकार दिले आहेत. त्या अधिकारांचा वापर करून अन्यायाविरोधात आवाज उठवणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. आज गरज आहे ती केवळ भ्रष्टाचाराच्या चर्चा करण्याची नाही, तर पुराव्यांसह कायदेशीर लढा उभारण्याची, नागरिकांनी केवळ सोशल मीडियावर पोस्ट टाकून थांबू नये. **(पान ३ वर)**

कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त रवि पवार स्वतःहून बदली करून घेणार? का अतिरिक्त आयुक्त प्रजीत नायर रवि पवारांना सांभाळून घेणार? वाचा पुढील अंकात...

२८ ऑक्टोबरला मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात मुंबईत मोर्चा – ॲड.प्रकाश आंबेडकर

अकोला : वंचित बहुजन आघाडीच्या वतीने निवडणूक आयोगाने चालवलेल्या घोटाळ्याविरोधात महाराष्ट्राच्या निवडणुका झाल्यापासून लढा सुरू करण्यात आला आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील ७५ लाख वाढलेल्या मतदानाचा डेटा देण्यात यावा, या मागणीपासून या लढ्याची सुरुवात झाल्याचे ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

येत्या २८ ऑक्टोबर रोजी या घोटाळ्याच्या विरोधात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात मुंबईत मोर्चा काढण्यात येणार आहे.

नवीन मतदारांसाठी असलेला फॉर्म क्रमांक ६ मतदार यादीतून चुकीने वगळण्यात आलेल्या नागरिकांनाही



७६ लाख मतवाढीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणणार!

भरायला सांगितला जात असल्याचा आरोप ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला. ते म्हणाले की, यापूर्वी मतदार असलेल्या व्यक्तीचे नाव चुकीने वगळले गेले असेल, तर ते नाव पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी स्वतंत्र कायदेशीर तरतूद नसल्याने निवडणूक आयोगाने फॉर्म क्रमांक ६ मध्ये बदल केला आहे. या फॉर्मसोबत संबंधित व्यक्तीला प्रतिज्ञापत्र द्यावे लागत असून, त्यात यापूर्वी मतदार नसल्याचे नमूद करावे लागत असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. यापूर्वी मतदार असलेल्या व्यक्तीने असे प्रतिज्ञापत्र दिल्यास खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केल्याचा आरोप होऊन संबंधित व्यक्तीवर फौजदारी कारवाई होऊ शकते, असे ॲड. प्रकाश आंबेडकर बोलले. निवडणूक आयोग नागरिकांना अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र देण्यास भाग पाडत असल्याचा आरोप करत, या प्रक्रियेला त्यांनी विरोध दर्शविला आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी राष्ट्रपतींनी परवानगी द्यावी, अशी मागणी २८ ऑक्टोबरच्या मोर्चाद्वारे करण्यात येणार असल्याचे ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

नागरिकांना गुन्हेगार ठरविण्याची परिस्थिती निर्माण करणाऱ्या प्रक्रियेविरोधात हा मोर्चा असल्याचे त्यांनी सांगितले. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविरोधात आवाज उठविण्यासाठी आणि महाराष्ट्रातील ७६ लाख मतदारांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे ते म्हणाले की, आमचा हा मोर्चा काँग्रेस पक्षासारखा राहणार नाही की, ज्याच्यामध्ये राजकीय पक्षांना बोलवायचंच नाही, पण नंतर आरोप करायचा की त्यांनी आम्हाला मदतच केली नाही. किंवा या आंदोलनामार्फत काँग्रेस जे एस्टॅब्लिश करायला मागतं, ते म्हणजे आम्हाला ओबीसी, दलित, आदिवासींच्या नेत्यांची गरज नाही. त्यांनी आमच्या पाठीमागे **(पान ३ वर)**

संपादकीय...

तीचा गणपती झाला, ती दुर्गा झाली; आता अंकिता भंडारीसाठी जनता रस्त्यावर उतरणार का?

एका मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी किती आंदोलने करावी लागतात? किती आई-वडिलांना आपल्या मुलीच्या न्यायासाठी दारोदारी भटकावे लागते? आणि एखाद्या प्रकरणात प्रभावशाली व्यक्तीच्या सहभागाचा संशय व्यक्त केला जात असेल, तर त्याची निष्पक्ष चौकशी होईपर्यंत समाजाने शांत बसायचे का?

देशात गणपतीसाठी उत्सव होतात, दुर्गेची पूजा होते, स्त्रीशक्तीचा जयघोष केला जातो. नवरात्रीमध्ये स्त्रीला देवीचे रूप मानले जाते. तिच्या सन्मानासाठी भाषणे केली जातात. मात्र, प्रत्यक्षात एखाद्या तरुणीवर अन्याय झाल्याचा आरोप समोर आला आणि तिच्या कुटुंबाला न्यायासाठी संघर्ष करावा लागला, तर आपण तिच्या पाठीशी किती ठामपणे उभे राहतो? आज हाच प्रश्न अंकिता भंडारी यांच्या प्रकरणाच्या निमित्ताने संपूर्ण देशासमोर उभा आहे.

ती गणपती झाली, ती दुर्गा झाली; आता अंकिता भंडारीसाठी जनता रस्त्यावर येणार का? हा प्रश्न केवळ उत्तराखंडमधील जनतेसाठी नाही, तर महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील नागरिकांसाठी आहे.

उत्तराखंडमधील पौडी गढवाल जिल्ह्यातील वनांतरा रिसॉर्टमध्ये १९ वर्षीय अंकिता भंडारी रिसेप्शनिस्ट म्हणून काम करत होती.

सप्टेंबर २०२२ मध्ये ती बेपत्ता झाली. त्यानंतर तिचा मृतदेह चिल्ला कालव्यात आढळला. या घटनेने संपूर्ण देश हादरला. तपासात रिसॉर्टचा मालक पुलकित आर्य आणि त्याचे दोन सहकारी अंकित गुप्ता व सौरभ भास्कर यांच्यावर खुनाचा आरोप ठेवण्यात आला. अंकितावर रिसॉर्टमध्ये येणाऱ्या पाहुण्यांना लैंगिक स्वरूपाच्या अतिरिक्त सेवा देण्यासाठी दबाव टाकला जात होता आणि तिने त्याला विरोध केला होता, असा तपासातील आरोप होता. मे २०२५ मध्ये न्यायालयाने या तिघांना हत्येच्या गुन्ह्यात दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली. त्यामुळे या तिघांची हत्येतील गुन्हेगारी जबाबदारी न्यायालयात सिद्ध झाली.

मात्र, या निकालानंतरही एक प्रश्न उपस्थित होत राहिला: अंकिता प्रकरणामध्ये एखाद्या प्रभावशाली व्यक्तीचा सहभाग होता का? या कथित 'व्हीआयपी'ची भूमिका काय होती? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची मागणी अंकिताच्या आई-वडिलांनी सातत्याने केली आहे. या प्रकरणात नव्याने वाद निर्माण झाला तो कथित व्हीआयपीच्या भूमिकेबाबत समोर आलेल्या ऑडिओ आणि व्हिडिओ क्लिप्समुळे.

उर्मिला सनावर यांनी काही ध्वनिमुद्रणांच्या आधारे या प्रकरणात प्रभावशाली व्यक्तीचा सहभाग असल्याचा आरोप केला. या आरोपांच्या संदर्भात भाजपचे ज्येष्ठ नेते दुश्यंत कुमार गौतम यांचे नाव चर्चेत आले. गौतम यांनी आपल्यावरील आरोप नाकारले आहेत. त्यामुळे त्यांच्यावरील आरोपांना न्यायालयीनरीत्या सिद्ध झालेला गुन्हा समजता येत नाही. ऑक्टोबर २०२६ मध्ये दुश्यंत कुमार गौतम यांची सिक्कीमच्या राज्यपालपदी नियुक्ती झाल्यानंतर अंकिताच्या कुटुंबाने या नियुक्तीला विरोध दर्शवला. तपास पूर्ण होईपर्यंत नियुक्तीला स्थगिती द्यावी, अशी त्यांची मागणी असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारच्या भूमिकेबाबतही प्रश्न विचारले जात आहेत.

महाराष्ट्रात गणपती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो. नवरात्रीमध्ये दुर्गेची पूजा केली जाते. स्त्रीशक्तीचा गौरव करणारे कार्यक्रम आयोजित केले जातात. परंतु स्त्रीचा सन्मान हा केवळ उत्सवांपुरता मर्यादित राहता कामा नये. स्त्रीला सुरक्षित वातावरण मिळाले पाहिजे. कामाच्या ठिकाणी तिच्या प्रतिष्ठेचे संरक्षण झाले पाहिजे. तिच्यावर दबाव आणला जात असेल, तर तिला कायद्याचे संरक्षण मिळाले पाहिजे. तिच्यावर गुन्हा झाला, तर तपास निष्पक्ष झाला पाहिजे. अंकिता भंडारी प्रकरण आपल्याला याच प्रश्नांची आठवण करून देते.

आपण देवीची पूजा करतो, पण जिवंत स्त्रीच्या हक्कांसाठी आवाज उठवतो का?

आपण स्त्रीशक्तीचा जयघोष करतो, पण अन्यायाविरोधात उभ्या राहणाऱ्या महिलांच्या संघर्षाला पाठिंबा देतो का?

आपण न्यायाच्या घोषणा देतो, पण पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रश्न विचारतो का?

या प्रश्नांची उत्तरे केवळ भाषणांतून मिळणार नाहीत. त्यासाठी नागरिकांची जागरूकता, संस्थांची उत्तरदायित्वाची भावना आणि कायद्याचे निष्पक्ष पालन आवश्यक आहे.


साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक – यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग – सी – २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे – ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात
Email : sangharshachaaawaz22@gmail.com
Email : sangharshachaaawaz@rediffmail.com
Mob. : 7276871008 / 9665487134



मागील अंकावरून

दुसऱ्याचे नुकसान करण्याची इच्छा धरणारे, वाईट मित्र, सोबती ही सहा कारणे मनुष्याच्या सत्यानाशास कारणीभूत ठरतात.

ज्याचे मित्र व सहयोगी, सोबती जर पापानी बरबटले असतील तर तो दोन्ही जगात नष्ट–भ्रष्ट होईल. या लोकात व परलोकात देखील जुगार, परनारीगमन, दारू, नाच, गाणे, दिवसभर झोप. अनेक गल्ली बोळांत फिरणे, वाईटाची संगत, परकोटीचा लोभ अशा एकूण नऊ कारणांनी मनुष्य बरबाद होतो. नेस्तनाबूत होतो.

जो जुगार खेळतो, जो नशापाणी करतो, परस्त्रीशी अनैतिक संबंध ठेवतो. जो नीच लोकांची संगत करतो, ज्ञानी लोकांची संगत करित नाही, त्यांचा सहवास टाळतो त्याची अधोगती होते. जशी कृष्ण पक्षातील चंद्राची कला. **क्रमश:**

सिगोलवाद सुत्त

मला उपलब्ध वाङमयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.

जयभीम!

उत्तमराव सोनवणे



सम्राट अशोक विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त बुद्ध-भीम गीतांच्या संगीतमय मैफिलीने पुणे दुमदुमले

पुणे : सम्राट अशोक विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त बौद्ध धम्मीय सेवा संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली पहिली 'धम्म पहाट' बुद्ध-भीम गीतांच्या संगीतमय मैफिलीने उत्साहात आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाली. मंगळवारी, २० ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला पुणे शहर व परिसरातील धम्मबांधव, भगिनी, तरुण-तरुणी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.



पंचशील ध्वजांच्या सजावटीने उद्यानाला मंगलमय स्वरूप

कार्यक्रमस्थळी उभारण्यात आलेल्या भव्य मंडपात पंचशील ध्वजांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. पहाटेच्या प्रसन्न वातावरणात बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या या सोहळ्याने उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले.

गायक राहुल शिंदे यांच्या गीतांनी उपस्थित मंत्रमुग्ध प्रसिद्ध गायक राहुल शिंदे यांनी सादर केलेल्या बुद्धगीतांनी आणि भीमगीतांनी उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या सुरेल आवाजातील गीतांमुळे संपूर्ण परिसर बुद्धमय आणि भीममय झाला. गीतांच्या माध्यमातून भगवान गौतम बुद्धांचा करुणा, मैत्री व समतेचा संदेश आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. ही संगीतमय धम्मपहाट उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरली.

धम्मबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

या कार्यक्रमाला बौद्ध धम्मीय सेवा संघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. मित्रपरिवार व नातेवाइकांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतल्यामुळे उद्यान परिसर उत्साहाने फुलून गेला होता.

बौद्ध धम्मीय सेवा संघाच्या वतीने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या 'धम्म पहाट' कार्यक्रमाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आयोजकांनी उपस्थितांचे आभार मानले. अशा उपक्रमांमुळे बुद्ध-भीम विचारांचा प्रसार होण्यास आणि नव्या पिढीमध्ये धम्मसंस्कार रुजण्यास मदत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे आयोजक विवेक बनसोडे, सतीश गायकवाड, युवराज बनसोडे, निलेशभाऊ आल्हाट आणि हणमंत पपुल, सचिन गजरमल यांनी केले होते.

जनतेच्या पैशातून जनतेची फसवणूक होत असेल, तर गप्प बसणे हाच भ्रष्ट व्यवस्थेला दिलेला पाठिंबा आहे म्हणून आता नागरिकांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावलेच पाहिजे...

(पान १ वरून) माहितीच्या अधिकाराचा वापर करून अधिकृत कागदपत्रे गोळा केली पाहिजेत. प्रत्येक प्रभागातील विकासकामांची माहिती संकलित केली पाहिजे. कोणत्या कामासाठी किती निधी मंजूर झाला, किती खर्च झाला, कामाचा दर्जा काय आहे आणि त्याच कामासाठी पुन्हा निधी का मागितला जात आहे, याचा अभ्यास केला पाहिजे. पुरावे मिळाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करावी. कारवाई झाली नाही किंवा गंभीर अनियमिततेची दखल घेतली गेली नाही, तर योग्य कायदेशीर मार्गाने न्यायालयात दाद मागीतलीच पाहिजे. यासाठी पुणे शहरातील सजग नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, आरटीआय कार्यकर्ते, अभियंते, कायदेतज्ज्ञ आणि पत्रकार यांनी एकत्र येऊन सार्वजनिक विकासकामांवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र नागरिक मंच उभारला पाहिजे. तरच ठेकेदारांच्या माध्यमातून अधिकारी आणि लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी यांच्यावर दबाव राहिल. आणि सर्वसामान्य नागरिकांना मुलभूत सुविधा मिळतील. अन्यथा ओरबाडून खाण्यात यांचा हात कोणी पकडणार नाही. हे सिध्द होत आहे. कारण कमला नेहरू हॉस्पिटल येथील जिन्यातील सुस्थितीतील स्टाईल्स फरश्या फोडून टाकल्याबाबत दि.१५/१०/२०२६ रोजी ज्येष्ठ नागरिक रमेश वि.खामकर यांनी भवनरचना प्रमुख मा.बिपीन शिंदे सर यांना तक्रार केली आहे. ते म्हणतात की, दि.१५/१०/२०२६ रोजी कामानिमित्त जाण्याचा प्रसंग आला असता कमला नेहरू हॉस्पिटल येथील जिन्यातील सुस्थितीतील स्टाईल्स फरश्या फोडण्यात आल्या आहेत. आपल्या अंतर्गत कार्यरत असलेले अधिकारी श्री.ढमाले ज्युनियर इंजिनिअर यांना विचारले असता ते म्हणतात की, अतिरिक्त आयुक्त मा.पवनीत कौर मॅडम यांच्या भेटी अंती ठरलेली कामामधील तसेच त्यांनी दिलेल्या आदेशानुसार ते काम चालू आहे. प्रश्न हा आहे सुस्थितीतील स्टाईल्स फरश्या तोडण्याचे काम आयएएस अधिकारी चुकीचे काम सांगणार नाहीत हे मात्र खात्रीशीर आहे. तरीही आपण त्वरित काम थांबवावे. असे म्हणून विनंती केली आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी फोडलेल्या स्टाईल्स फरश्या वृत्तपत्राने झाकण्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे अनावश्यक, गरज नसताना, चांगल्या स्थितीतील फरश्या फोडून त्याठिकाणी नविन काम करण्यासाठी कोणत्या लोकप्रतिनिधीनी शिफारस केली होती? किंवा संबंधित हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांनी शिफारस केली होती? का स्वत: भवन विभागाने या कामाची निविदा काढून दिवाळी साजरी करण्याचे ठरविले आहे? असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. अशाच पध्दतीने दुसरे प्रकरणही मोठ्या प्रमाणात गाजत आहे. पुणे महानगरपालिका प्रभाग क्रमांक २१ मध्ये महानगरपालिकेची भिंत चोरीला गेलेबाबत पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे वाणिज्य व उद्योग विभाग व्यापारी सेलचे अध्यक्ष भरत ब.सुराणा यांनी दि.२४/१०/२०२६ रोजी पत्रकार परिषद घेवून गंभीर आरोप केलेले आहेत. याअगोदर त्यांनी दि.२३/१०/२०२६ रोजी पुणे महापालिकेचे महापौर, आयुक्त, गटनेते, स्वारगेट पोलिस स्टेशन यांना निवेदन दिले आहे. ते या निवेदनामध्ये म्हणतात की, प्रभाग क्रमांक २१ मध्ये (जुना प्रभाग २८) (२०२० चे सभागृह नेते व २०२६ चे स्थायी समिती अध्यक्ष माननीय भिमाले साहेब याच प्रभागातून निवडून आले.) २०२१-२०२२ च्या दरम्यान प्रभाग क्रमांक २८ मध्ये सॅलिसबरी पार्क इथे किलबिल शाळा समोर एक सुशोभिकरण म्हणून भवन विभागामार्फत दगडाची भिंत बांधण्यात आली होती ती भिंत बांधण्यासाठी अंदाजे १३ लाख रूपये ठेकेदाराला देण्यात आले परंतु २०२६ मध्ये अचानक ती भिंत चोरीला गेली. ती भिंत जागेवर नाही म्हणून भवन विभागाने महानगरपालिकेच्या पथ विभाग, घनकचरा विभाग, परिमंडळ झोन ५, बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांना पत्र देवून नवीन भिंत बांधण्याबाबत (चोरीला गेलेली भिंत जागी) माहिती विचारणा केली, त्या ठिकाणी आता एक नवीन भिंत बांधण्याचे काम चालू आहे ज्याचं वर्क ऑर्डर नाही टेंडर नाही. काही नसताना त्याठिकाणी ती चोरीला गेलेली भिंत लपवण्यासाठी नवीन भिंतीच काम चालू करण्यात आले आहे.

मी स्वत: भवन विभाग, पथ विभाग, परिमंडळ ५, बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांना भिंतीबाबत फोनवरून व प्रत्यक्ष माहिती घेण्याचा प्रयत्न केला जुनी भिंत कुठे आहे व नवीन भिंत बांधण्याची वर्क ऑर्डर आहे का? परंतु कोणालाच माहित नाही याबाबत कोणी उत्तर देवू शकले नाही ही दुर्देवाची बाब आहे तसेच गंभीर बाब आहे.

दि.२२/१०/२०२६ रोजी भवन विभागाचे नागटिळक साहेब, खामकर साहेब आणि मी त्या भिंतीच्या जागेवर सर्वे करायला गेलो असता त्याठिकाणी स्थायी समिती अध्यक्ष भिमाले यांचे काही कार्यकर्ता येवून आरडाओरडा केला. माझे अंगावर धावून आले. मला दमदाटी आणि धमकी दिली व दहशत निर्माण केली. तुम्ही भिमालेचा व्हिडीओ का टाकताय तुम्हाला बघून घेवू पुढे काय होत बघा अशा प्रकारे धमकी दिली.

तरी पुणे महानगरपालिका आयुक्त साहेब २०२१ च्या दरम्यान बांधलेली दगडाची भिंत कुठे गेली किंवा चोरीला गेली याची चौकशी व्हावी तसेच आता नवीन वर्क ऑर्डर नसताना जागेवर भिंतीच काम कोणी चालू केले आहे याची माहिती घेवून संबंधितांवरती त्वरीत कार्यवाही करावी अन्यथा पुणे महानगरपालिके समोर तीव्र आंदोलन करण्यात येईल. असा इशारा दिला. तसे पाहता भवन रचना कार्यालय, पुणे महानगरपालिका जा.क्र.४४१२, दि.३१/१२/२०२१ रोजी मे.शिवस्वयंभू रियल्टर्स, यांना प्रभाग क्र.२८ व किलबिल शाळेजवळील परिसर सुशोभिकरण करणे संदर्भात वर्कऑर्डर देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने तिथे दगडी आणि विटाचे सुंदर भिंत उभारण्यात आली होती. ते काम चालू असतानाचे आणि आता नव्याने बांधण्यात येत असलेली भिंत याचे छायाचित्र भरत ब.सुराणा यांनी पत्रकार परिषदेत दिले आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने अधिक्षक अभियंता कार्यालय, भवनरचना विभाग पुणे महानगरपालिका जा.क्र.४६९८ दि.२२/१०/२०२६ रोजी महापलिका सहायक आयुक्त बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांना उपअभियंता चंद्रसेन नागटिळक यांनी पत्रव्यवहार केला आहे. ते म्हणतात की, बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय परिसरातील प्रभाग क्र.२१ मधील संदेश नगर हाजी कादर भाई सातारकर मार्ग येथील किलबिल शाळेजवळ सद्यस्थितीत सुरू असलेल्या बांधकामाची माहिती मिळणेबाबत. उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, बिबवेवाडी मार्केट यार्ड परिसरातील हाजी कादर भाई सातारकर मार्ग संदेश सोसायटी येथे किलबिल शाळा रस्त्यालगत भिंतीचे बांधकाम सुरू आहे. सदर ठिकाणी प्रत्यक्ष केलेल्या पाहणीनुसार आरसीसी कॉलम, विटांची भिंत आणि सेंट्रिंगचे काम सुरू असल्याचे दिसून येत आहे. सदर कामाबाबत स्थानिक नागरिक व तक्रारदार श्री.भरत सुराणा यांनी भवन रचना विभागामध्ये कामाची माहिती मिळण्याकरिता अभिलेख रजिस्टरमध्ये माहिती अधिकार कायद्यांतर्गत नोंद केलेली आहे. त्यानुसार त्यांना सदर कामाबाबतची माहिती देणे आवश्यक आहे. तक्रारदार श्री.भरत सुराणा हे यासंदर्भात कार्यालयाशी वारंवार संपर्क साधत आहेत. तरी उपरोक्त काम बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयामार्फत किंवा अन्य कोणत्या विभागामार्फत सुरू आहे. याची माहिती मिळणेस विनंती आहे. अशा पध्दतीचे पत्रव्यवहार होत असेल आणि पुणे महापालिकेच्या विविध विभागाचा समन्वय नसल्याने मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचे सिध्द होत आहे. प्रश्न असा पडतो की, पुणे महापालिकेने असे कोणते संगणक प्रोग्राम केला आहे. की, कोणत्याच खात्याची कोणाला माहिती मिळत नाही. फक्त विकासाच्या नावावरती प्रत्येकजण आपआपले स्वहित पाहत आहे? हे मात्र नक्की. यावर सत्ताधारी, विरोधी पक्षनेते आणि विविध गटनेते काय भुमिका घेणार याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

२८ ऑक्टोबरला मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात मुंबईत मोर्चा...

(पान १ वरून) फरफटत यावं. भारतीय जनता पक्षाची मुसलमानांच्या संदर्भात जी भूमिका आहे ती त्यांनी वापरली आहे.

तसेच आम्ही या २८ तारखेच्या मोर्च्यामध्ये डावे, समाजवादी पक्ष, विद्यार्थी संघटना, आदिवासी संघटना यांना निमंत्रण देण्यात आले आहे. आपण या २८ तारखेच्या मोर्च्यामध्ये सहभागी होऊन इलेक्शन कमिशन जे इथल्या भारतीय नागरिकांना गुन्हेगारी करण्यास प्रवृत्त करतंय किंवा गुन्हेगार करतंय, त्याच्या विरोधातला हा मोर्चा आहे असे देखील ते म्हणाले.

मोर्च्याची सुरुवात २८ ऑक्टोबर रोजी भायखळा येथील राजमाता जिजाऊ उद्यान ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपर्यंत असेल. या मोर्चाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ७६ लाख मतदारांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणणार असल्याचे ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

पत्रकार परिषदेला राज्याचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे, डॉ. धैर्यवर्धन पुंडकर, राज्याचे नेते जितरत्न पटाईत, अकोला जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, मिलिंद इंगळे उपस्थित होते.

‘मुख्यमंत्री आरोग्य संवाद : जागर महाराष्ट्र राज्यआरोग्याचा’ उपक्रम पुणे जिल्ह्यात यशस्वीरीत्या संपन्न!

११८ सत्रांतून ११,६३० विद्यार्थ्यांपर्यंत आरोग्यजागृती; ११,०९७ विद्यार्थ्यांनी घेतली आरोग्यविषयक शपथ

पुणे : विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देणे आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेला ‘मुख्यमंत्री आरोग्य संवाद : जागर आरोग्याचा’ हा उपक्रम पुणे जिल्ह्यात दिनांक १३ ते २४ ऑक्टोबर दरम्यान यशस्वीरीत्या संपन्न झाला.

महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत, या कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून वैद्यकीय व आरोग्यविषयक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यात आली.

जिल्ह्यात ११८ सत्रांचे आयोजन



जिल्ह्यात या उपक्रमांतर्गत एकूण ११८ आरोग्यजागृती सत्रांचे आयोजन करण्यात आले. या सत्रांमध्ये ११ हजार ६३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आरोग्यविषयक शपथ घेतली. विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी (MUHS) संलग्न महाविद्यालयांच्या माध्यमातून ८१ सत्रे, आयुष महाविद्यालयांच्या माध्यमातून ३३ सत्रे, तर इतर संस्थांच्या माध्यमातून ४ सत्रे आयोजित करण्यात आली. याशिवाय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांनीही या उपक्रमात विशेष सहभाग नोंदवून आरोग्यजागृतीच्या कार्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली अशी माहिती डॉ. मानसिंग साबळे यांनी दिली.

अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयाचे विशेष योगदान

जिल्ह्यात अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयाने या उपक्रमांतर्गत सर्वाधिक ११ सत्रांचे आयोजन केले. या सत्रांमध्ये ६९३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि ६९३ विद्यार्थ्यांनी आरोग्यविषयक शपथ घेतली. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून आरोग्यजागृतीचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचविण्यासाठी महाविद्यालयाने दिलेले योगदान उल्लेखनीय ठरले.

मानसिक आरोग्य, व्यसनमुक्ती आणि निरोगी जीवनशैलीवर भर

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्याचे महत्त्व, व्यसनमुक्त जीवन, आत्महत्या प्रतिबंध, संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक व भावनिक आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असल्याचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक योग्य सवयी विकसित व्हाव्यात, त्यांनी स्वतःच्या आरोग्याबाबत सजग राहावे आणि आपल्या कुटुंबात तसेच समाजातही आरोग्यजागृती करावी, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढविणे, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचे महत्त्व अधोरेखित करणे आणि निरोगी समाजनिर्मितीस हातभार लावणे, या दृष्टीने या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक : विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यजागृती निर्माण करून व्यसनमुक्त, निरोगी आणि आत्मविश्वासपूर्ण पिढी घडविणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. तरुणाईच्या आरोग्यातूनच महाराष्ट्राचे उज्ज्वल भविष्य घडेल. या जनजागृती अभियानात योगदान देणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन!

पुणेकरांच्या आरोग्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने महापालिका भवनासमोर आंदोलन छेडले जाईल – गटनेते, ॲड.रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम

पुणे : पुणे शहरात सध्या डेंग्यूने उच्छाद मांडला असून सामान्य नागरिक, लहान मुले आणि वृद्ध गंभीर आजाराचा सामना करत आहेत. गेल्या काही महिन्यांत डेंग्यूच्या रुग्णांची संख्या हजारोच्या पार गेली असून रुग्णालयांत जागा मिळवण्यासाठी व उपचारासाठी नागरिकांचे हाल होत आहेत.येत्या ४८ तासांत डेंग्यूच्या नियंत्रणासाठी ठोस, प्रत्यक्ष आणि परिणामकारक उपाययोजना सुरू झाल्या नाहीत, तर पुणेकरांच्या आरोग्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने महापालिका भवनासमोर आंदोलन छेडले जाईल. असा इशारा काँग्रेसचे गटनेते, ॲड.रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम यांनी दिला.

पुणे शहरात चालू वर्षात (जानेवारी ते ऑक्टोबर २०२६ अखेर) डेंग्यूच्या रुग्णांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. या वर्षभरात पुण्यात डेंग्यूच्या एकूण २,००९ पेक्षा जास्त रुग्णांची नोंद झाली आहे. पावसाळा आणि त्यानंतरच्या काळात (विशेषतः ऑगस्ट ते ऑक्टोबर दरम्यान) डेंग्यूचा प्रादुर्भाव सर्वाधिक वाढला असून, केवळ सप्टेंबर महिन्यातच ६०० हून अधिक रुग्ण आढळले होते.

शहरात कोथरूड आणि औंध-बाणेर परिसरामध्ये डेंग्यूचे सर्वाधिक रुग्ण आढळले आहेत. शहरातील अनेक भागांत कचऱ्याचे साम्राज्य, तुंबलेली गटारे, रस्त्यांवरील खड्डे आणि अस्वच्छता यांमुळे डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर होत आहे. महापालिकेकडून केली जाणारी धूर फवारणी (Fogging) आणि औषध फवारणी केवळ कागदावर राहिलेली आहे असे स्पष्ट होत आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी चालू असलेला हा खेळ संतापजनक आहे.

प्रशासनाच्या या ढिसाळ आणि



अकार्यक्षम कारभारामुळे आज शहरातील आरोग्य व्यवस्था कोलमडली आहे. आपण केवळ बैठका, जाहीर आवाहन आणि पोकळ आश्वासने देण्यात वेळ घालवत आहात, तर दुसरीकडे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. महापालिकेचा आरोग्य विभाग नेमका काय काम करत आहे, असा संतप्त सवाल आज पुणेकर विचारत आहेत. सबब काँग्रेस पक्षाच्या वतीने आम्ही खालील मागण्या करीत आहोत. शहरातील प्रत्येक प्रभागात विशेष स्वच्छता मोहीम राबवून साचलेले पाणी, कचरा व गटारांची तातडीने सफाई करण्यात यावी. धूर व औषध फवारणी: प्रत्येक गल्लीबोळात दररोज नियमित धूर फवारणी व डासनाशक औषधांची फवारणी झालीच पाहिजे. याचा दैनंदिन अहवाल जाहीर करण्यात यावा. मोफत वैद्यकीय तपासणी व उपचार: महापालिकेच्या सर्व रुग्णालयांत डेंग्यूच्या तपासण्या (NS1, प्लेटलेट्स) आणि उपचार व्यवस्था उपलब्ध करून द्यावेत. कामचुकार अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई: ज्या भागात डेंग्यूचे रुग्ण सातत्याने वाढत आहेत, त्या भागातील जबाबदार संबंधित अधिकारी यांचेवर कडक शिस्तभंगाची व निलंबनाची कारवाई करण्यात यावी. जर येत्या ४८ तासांत डेंग्यूच्या नियंत्रणासाठी ठोस, प्रत्यक्ष आणि परिणामकारक उपाययोजना सुरू झाल्या नाहीत, तर पुणेकरांच्या आरोग्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने महापालिका भवनासमोर आंदोलन छेडले जाईल.

डेंग्यू उपचारासाठी पुरेसे बेड उपलब्ध; नागरिकांनी घाबरून न जाता खबरदारी घेण्याचे पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांचे आवाहन

पुणे : शहरात डेंग्यूचा वाढता प्रादुर्भाव पाहता, पुणे महानगरपालिका आयुक्त यांनी नुकतेच शनिवार दिनांक २४ ऑक्टोबर २०२६ रोजी बाणेर येथे नव्याने उभारण्यात आलेल्या संसर्गजन्य आजारांच्या डॉ. नायडू रुग्णालयाला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. या भेटीदरम्यान आयुक्तांनी डेंग्यूच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने मनपामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना, एकूण रुग्णसंख्या, रुग्णालयातील उपलब्ध बेडची परिस्थिती तसेच डेंग्यू आजाराची लक्षणे आणि कारणांचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी बोलताना मनपा आयुक्तांनी स्पष्ट केले की, सद्यस्थितीत महापालिका रुग्णालयांमध्ये डेंग्यूच्या उपचारासाठी पुरेसे बेड आणि औषधसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही प्रकारे घाबरून न जाता, डेंग्यूची कोणतीही लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या महानगरपालिका किंवा इतर रुग्णालयांशी संपर्क साधून उपचार घ्यावेत. तसेच, डेंग्यूच्या डासांची पैदास रोखण्यासाठी आणि त्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी नागरिकांनी आपल्या घराच्या आसपास पाणी साचू न देणे व योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. डेंग्यूचा प्रादुर्भाव तातडीने आटोक्यात आणण्यासाठी केवळ आरोग्य विभागच नव्हे, तर महापालिकेच्या इतर विभागांचाही सहभाग महत्त्वाचा असल्याचे आयुक्तांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर त्यांनी आरोग्य विभागासोबतच बांधकाम विभाग, अतिक्रमण विभाग आणि घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी आपापसात समन्वय ठेवून सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने युद्धपातळीवर राबवाव्यात, अशा सक्त सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. यामध्ये बांधकाम साईट्सवरील साचलेले पाणी, कचरा डेपो आणि अतिक्रमणाच्या ठिकाणी होणारी डासोत्पत्ती



रोखण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. या पाहणी दौऱ्यावेळी पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, डॉक्टर्स आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. महत्त्वाची आकडेवारी आणि सद्यस्थिती मागील ३ वर्षांची आकडेवारी तपासली असता २०२४ मध्ये पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुमारे ४९०८ इतक्या डेंग्यू पोझीटिव्ह रुग्णांची नोंद तर २०२५ मध्ये २३९१ रुग्णाची नोंद झालेली असून जानेवारी २०२६ ते २० ऑक्टोबर २०२२६ पर्यंत २२९१ डेंग्यू रुग्णाची नोंद झालेली आहे. यावरून मागील २ वर्षाच्या तुलनेत थोडीशी वाढ झाल्याची दिसून येत आहे.वातावरणीय बदल, वाढती बांधकामे .पाणीकपातीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या स्वरूपात पाणी साठे करणे, इनडोअर प्लांट्स व टेरेस गार्डन यासाठी वापरण्यात येणाऱ्या कुंड्या व ताटल्यामध्ये साचणारे पाणी .इ कारणे एडीस डासांच्या वाढीस करणीभूत ठरत आहे.

गृह तपासणी मोहीम: महापालिकेच्या पथकांनी सुमारे १४ लाख घरांमध्ये भेट देऊन २८,३१,३८६ कंटेनर/पाण्याच्या साठ्यांची तपासणी केली. डासोत्पत्ती व कारवाई: तपासणीदरम्यान १३,००० घरांमध्ये १८,८८५ कंटेनरमध्ये 'एडीस' डासांच्या अळ्या आढळल्या. याप्रकरणी २,६६४ मिळकतींना नोटिसा बजावण्यात आल्या असून रु. ६,३०,०००/- चा दंड वसूल करण्यात आला आहे.

मोफत तपासणी व प्रयोगशाळा चाचण्या

RDK किट्सची उपलब्धता: पुणे महापालिकेच्या सर्व दवाखान्यांमध्ये मोफत डेंग्यू निदानासाठी रैपिड डायग्नोस्टिक किट्स (RDK) उपलब्ध करण्यात आले आहेत. कन्फर्मेटरी चाचण्या: सेंटिनेल सेंटर्स (डॉ. नायडू रुग्णालय, डॉ. कोटणीस रुग्णालय, कमला नेहरू रुग्णालय) येथे सीरम सॅम्पल्स पाठवून मोफत कन्फर्मेटरी चाचण्यांची सोय करण्यात आली आहे.

IHIP पोर्टल नोंदणी: सर्व खाजगी व शासकीय रुग्णालयांनी रुग्णांची माहिती IHIP पोर्टलवर नोंदवणे अनिवार्य असून, दुबार नोंद (Double Entry) होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले आहेत.

नागरिकांना आवाहन- पुणे महापालिके मार्फ त सर्व आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवल्या जात आहेत. नागरिकांनी आपल्या परिसरात कुठेही पाणी साचू न देता, पाण्याच्या टाक्या झाकून ठेवाव्यात आणि महापालिकेच्या तपासणी पथकांना पूर्ण सहकार्य करावे तसेच रुग्णालयामध्ये पुरेशा खाटा उपलब्ध असल्याने घाबरून जाऊ नये व डॉक्टरांच्या सल्याने वेळीच औषध उपचार करून घ्यावेत,तसेच ताजा व सकस आहार, विश्रांती व भरपूर द्रवपदार्थ पिणे आवश्यक आहे. असे आवाहन पुणे महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.